RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक ९६] बुधवार, ऑगस्ट ६, २०२५/श्रावण १५, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ३२२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ ऑगस्ट, २०२५.

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक एसआयए-२०२५/प्र.क्र.९१/अ-२.— ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) महाराष्ट्र राज्याला लागू असतांना, (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम १० क मध्ये, अशी तरतूद आहे की, राज्य शासनास लोकहितास्तव राजपत्रातील अधिसूचनेद्वारे उक्त कलम १०क मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रकल्पांना, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन आणि प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येईल;

ज्याअर्थी, राज्य शासनाला असे दिसून आले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-१ मध्ये नमूद केलेल्या जमिनी या अनुसूची-२ मध्ये नमूद केलेल्या प्रकल्पासाठी आवश्यक आहेत किंवा आवश्यक असण्याची शक्यता आहे, उक्त कलम १० क (यापुढे "उक्त प्रकल्प" म्हणून संदर्भित) च्या खंड (च) अंतर्गत समाविष्ट आहे, म्हणजेच; सार्वजनिक-खाजगी भागीदारीखालील प्रकल्पांसह पायाभूत सुविधा प्रकल्प, ज्यात जमिनीची मालकी राज्य शासनाकडे निहित असण्याचे चालू राहील;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने उक्त प्रकल्पांकरिता केवळ किमान निव्वळ जमिनीची आवश्यकता भासेल हे लक्षात घेऊन प्रस्तावित संपादनासाठीच उक्त जमिनीचे व्याप्तिक्षेत्र निश्चित केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास याद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम १० क खालील उक्त प्रकल्पाला उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन आणि प्रकरण तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून लोकहितास्तव सूट देणे इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम १० क द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत, त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे लोकहितास्तव, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देत आहे.

अनूसूची- एक

जमिनींचा तपशील

मौजे- मोघरपाडा तालुका व जिल्हा- ठाणे

अ. क्र.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	संपादित करावयाचे एकूण क्षेत्र (चौ. मी.)
१	२७	-	००.००.२७
२	२८	१	००.००.९२
३	२८	३ ब	००.१२.३२
एकूण			००.१३.५१

अनूसूची- दोन

प्रकल्पाचा तपशील

प्रकल्पाचे नाव	:-	मुंबई मेट्रो प्रकल्प ४, ४ अ, १० व ११.
प्रकल्पाचा तपशील	:-	मुंबई मेट्रो प्रकल्प ४, ४ अ, १० व ११, मौजे-मोघरपाडा, तालुका व जिल्हा-ठाणे.
संपादन अभिकरणाचा तपशील	:-	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्रीराम यादव,
शासनाचे सहसचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032

Dated the 6th August, 2025.

NOTIFICATION

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. SIA-2025/C.R.91/A-2.—WHEREAS, section 10A of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), in its application to the State of Maharashtra (hereinafter referred to as "the said Act"), provides that the State Government may, in the public interest, by notification in the *Official Gazette*, exempt any of the projects mentioned in the said section 10A from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act;

AND WHEREAS, it appears to the Government of Maharashtra that the lands mentioned in Schedule-I appended hereto are required or likely to be required for the project mentioned in Schedule-II appended hereto, which is covered under clause (f) of the said section 10A (hereinafter referred to as "the said project") *i.e*; infrastructure projects including projects under public-private partnership where the ownership of land continues to vest with the Government: Provided that, the State Government shall, before issue of notifiction, ensure the extent of land for the proposed acquisition keeping in view the bare minimum land required for such project;

AND WHEREAS, the Government of Maharashtra has ensured the extent of the said lands for the proposed acquisition being bare minimum land required for the said project;

AND WHEREAS, the Government of Maharashtra considers it expedient in the public interest to exempt the said project under section 10A of the said Act from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by section 10A of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, exempts the said project, in the public interest from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

Schedule-I

Description of Lands

Village Mogharpada, Taluka & District Thane

Sr.No.	Survey No./ Hissa No.	Land to be Acquire H.R.
1.	27	00.00.27
2	28/1	00.00.92
3	28/B	00.12.32
Total		**00.13.51**

Schedule - II

Description of Project

Name of the Project	:-	Cardepo-Metro Project-4, Metro Phase-4A,10 &11 Mauje – Mogharpada, Taluka & District-Thane.
Description of Project	:-	Cardepo-Metro Project-4, Metro Phase-4A,10 &11 Mauje – Mogharpada, Taluka & District-Thane.
Details of Acquiring Agency	:-	Mumbai Metropolitan Region Development Authority.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIRAM YADAV,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.